**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ८७ वा ● रविवार १३ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 87 | Date : 13/08/2023 | blow : Sunday, | Page 4 | Price 4

## रुग्णांना जेनेरिक औषधं लिहून देणं बंधनकारक, औषधांच्या ब्रँडचा उल्लेख केल्यास कारवाई

नवी दिल्ली : राष्ट्रीय वैद्यकीय आयोग ने डॉक्टरांसाठी काही नवीन नियम लागू केले आहेत. यानुसार रुग्णांना जेनेरिक औषधे प्रिस्क्राइब न केल्यास डॉक्टरांवर कारवाई होऊ शकते. डॉक्टरांनी रुग्णांना जेनेरिक औषध देण्यावर अधिक भर द्यावा, यासाठी राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने नवीन नियम लागू केले आहेत. सध्या डॉक्टरांनी रुग्णांना जेनेरिक औषधे लिहून देणं आवश्यक असलं तरी, याबाबत काही नियमही नव्हता. ही बाब लक्षात घेत NMC ने जेनेरिक औषधे प्रिस्क्राइब करण्यासाठी नवा नियम लागू केला आहे.



डॉक्टरांना आता जेनेरिक औषधे लिहून देणे बंधनकारक असले तरी २००२ मध्ये छचउ ने जारी केलेल्या नियमांमध्ये कोणतीही दंडात्मक तरतूद नमूद केलेली नाही. मात्र, आता संबंधात नवीन नियमावली जारी करण्यात आली असून संबंधित डॉक्टरांवर कारवाई करण्यात येईल. तसेच त्या डॉक्टरांचं लायसन्स रद्द होऊ शकतं. । पान २ वर

# आसाममध्ये 'जलप्रलय'! सुमारे 30 हजार लोकांना फटका, १७५ गावं पाण्याखाली



आसाम : भारताच्या ईशान्येकडील आसाम राज्यात जलप्रलय आलं आहे. आसामधील सहा राज्यांमध्ये भीषण पूरस्थिती निर्माण झाली असून हजारो नागरिकांना याचा फटका बसला आहे. आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, सहा जिल्ह्यातील सुमारे ३०,००० लोकांना पुराचा फटका बसला आहे.

धेमाजी जिल्ह्यातील ब्रम्हपुत्रा नदीच्या पाण्याची पातळी अद्याप धोक्याची पातळीहून जास्त आहे. पुराचा सर्वाधिक फटका धेमाजी आणि दिब्रुगड जिल्ह्यांना बसला आहे. याचा थेट परिणाम धेमाजीमधील १९,१६३ आणि दिब्रुगड जिल्ह्यामधील सुमारे सहा हजार लोकांना बसला आहे. ASDMA नुसार, धेमाजी, दिब्रुगड, दरंग, जोरहाट, गोलाघाट आणि शिवसागर जिल्ह्यातील १७५ गावं पाण्याखाली गेली आहेत.

जोनई, धेमाजी, गोगामुख आणि सिस्सीबोरगाव महसूल मंडळातील ४४ गावांना पुराच्या पाण्याचा फटका बसला आहे. याचा सर्वाधिक परिणाम सिस्सीबोरगाव भागात झाला आहे. येथे १०,३०० हून अधिक लोक बाधित झाले आहेत. पुराचे पाणी पुढे सरकत असल्याने लोकांना घरे सोडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करावं लागत आहे.

धेमाजी जिल्ह्यात एकूण ३९६.२७ हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं आहे. पूरग्रस्त सहा जिल्ह्यांतील २,०४७.४७ हेक्टर क्षेत्र पुराच्या पाण्यात बुडालं आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.

ब्रह्मपुत्रा नदीने धोक्याची पातळी ओलांडली आहे. अद्यापही नदीचा प्रवाह धोक्याच्या पातळीच्या वरती आहे. याशिवय शिवसागरमधील डिखू नदी आणि गोलाघाट जिल्ह्यातील नुमालीगडमधील धनसिरी नद्यांनीही धोक्याची पातळी ओलांडली आहे. त्यामुळे नदीकाठच्या लोकांना सर्तकतेचा इशारा देण्यात आला असून नागरिकांच्या । **पान २ वर**

## पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी ५० हजार कोटींचे पूल उभारणार : ना.गडकरी

पुणे : पुण्यातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुण्यात ५० हजार कोटींचे पूल हे रस्ते वाहतूक आणि महामार्ग विभागातर्फे उभारण्यात येतील आणि पुणे-बंगळुरू आणि पुणे ते संभाजीनगर हे दोन्ही रस्ते प्रकल्पही लवकरच पूर्ण करण्यात येतील, असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

पुणे शहरात एनडीए चौकातील (चांदणी चौक) राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ वरील एकात्मिक पायाभूत सुविधा आणि रस्ते विकास प्रकल्प तसेच खेड व मंचर रस्ता चौपदरीकरणाच्या लोकार्पण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे आदी उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री.गडकरी म्हणाले, येणाऱ्या काळात पुणे हे देशाच्या विकासाचे केंद्र होणार आहे, पुणे अनेकांना रोजगार देणार आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारं शहरही पुणेच आहे. चोवीस तास पाणी आणि उत्तम रस्ते पुण्यासाठी आवश्यक आहेत. भारत सरकारच्यावतीने निश्चितच पुण्याचा विकासासाठी सहकार्य करण्यात येईल. पुण्यातील प्रकल्पांबाबत लवकरच मुख्यमंत्र्यांशी चर्चा करण्यात येईल.

पुणे-सातारा महामार्गावरील दुमजली डबलडेकर पूल, हडपसर-यवत उन्नत मार्ग, पुणे-शिरूर-अहमदनगर ५६ किलोमीटरचा मार्ग, तळेगाव-शिक्रापूर-चाकण ५४ किलोमीटरचा मार्ग आणि नाशिक फाटा ते खेड मार्गाचा प्रकल्प अहवाल तयार आहे. पुणे विभागात पावणे दोन लाख कोटी रुपयांचे प्रकल्प देण्यात आले असून त्यातील काही पूर्ण झाले आहेत. १२ हजार कोटींचे संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी मार्ग डिसेंबर अखेर पूर्ण होतील असे त्यांनी सांगितले.

गडकरी म्हणाले,चांदणी चौक प्रकल्पासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. **पान २ वर**

## संसद अधिवेशनाचे सूप वाजले; लोकसभेत ३९ तासांचे कामकाज

नवी दिल्ली : संसदेच्या पावसाळी अधिवेशनाचे अखेर गदारोळातच सूप वाजले आहे. अखेरच्या दिवशी कामकाज संपले तेव्हा लोकसभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथसिंह हे प्रमुख नेते उपस्थित होते. दरम्यान, लोकसभेत केवळ ३९ तास कामकाज झाल्याची माहिती अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दिली. मणिपूरमधील हिंसाचार तसेच दिल्ली सेवा विधेयकावरील गदारोळावरून पावसाळी अधिवेशन गाजले. मणिपूरच्या मुद्द्यावरून काँग्रेसने लोकसभेत सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव दाखल केला होता. मात्र सरकारकडे पुरेसे संख्याबळ असल्याने हा प्रस्ताव पडला. विरोधी पक्षांनी पंतप्रधान मोदी यांचे भाषण सुरू असतानाच विरोधकांनी सभात्याग केल्याने लोकसभा अध्यक्षांना मतविभाजन करण्याची वेळ आली नाही. डिजिटल प्रोटेक्शन विधेयक, दिल्ली सेवा विधेयक यासारखी काही महत्त्वाची विधेयके मंजूर झाली. लोकसभेत अखेरच्या दिवशी देखील फारसे कामकाज होऊ शकले नाही.

## दुधनी ते नंदर्गी रस्त्याची भूमी पूजन आमदार सचिन कल्याणशेट्टी याचे हस्ते संपन्न

दुधनी/निंगप्पा निंबाळ : दि.१२ अक्कलकोट तालुक्यात दुधनी ते नंदर्गी या रस्त्यांची भूमिपूजन आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले

दुधनी ते नंदर्गी १.१५० कि.मी रस्ता सुधारणा रक्कम १४२.५० लक्ष एवढी निधी मंजुर केले असुन या रस्त्याची भूमिपूजन आ. सचिन कल्याणशेट्टी, दुधनीतील प्रतिष्ठित आडत व्यापारी राजशेखर दोशी, सिध्दाराम येगदी, राजशेखर सोळसे यांनी केले.


गावातील प्रतिष्ठित शेतकरी शंकर भांजी यांच्या मळ्यात कल्याणशेट्टी यांनी वडार समाज, व गावातील अन्य समस्यांचे निवेदन स्विकारले तर शंकर भांजी यांनी सर्व कार्यकर्त्यांना चहा पाण्याची व्यवस्था केले होते. त्यानंतर दुधनीतील बुध्द नगर येथील लक्ष्मी मंदिराची दर्शन कल्याणशेट्टी यांनी घेतले व तेथील मंदिराचे मंडप व रमाई योजना अंतर्गत घरकुल बांधुन देण्याची आश्वासन दिले.। भूमिपूजन वेळी अप्पु परमशेट्टी, लक्ष्मपुत्र पाटील, अतुल मेळकुंदे, महेश पाटील, बसवराज हौदे, शिवशरण हबशी, संतोष जोगदे, दौलतराय हौदे, धर्मण्णा प्याटी, जगन्नाथ राठोड, बाबा टक्कळक्की, हणमंत कलशेट्टी, गुरुशांत अल्लापुर, काशीनाथ यरगल, शंकर गोटे, राजु इंगळे, भिमाशंकर अंदेनी, रामचंद्र बिराजदार, शांतलिंग गुड्डोडगी, विजयकुमार मानकर, नागनाथ तड्डी, भिमाशंकर फुलारी, महांतेश बिराजदार, अंबण्णा निंबाळ, सातु अंदेनी, ईरय्या पुराणिक, सुगरेश बाहेरमठ, शिवानंद चंडके, सद्दाम



नदाफ, गुरुशांतप्पा पाटील, बसवराज परमशेट्टी, सैदप्पा परमशेट्टी, शिवानंद ठक्का, शिवशरण जोजन, चन्नप्पा ठक्का, मंजुनाथ दैनक, शिवराज गुळगोंडा, रमेश भैरामडगी, संजय चंडके, बसवराज गोटे, अर्जुन पुजारी, मल्लीनाथ कामनळ्ळी, गुरुशांत कोळी आदी पंचक्रोशीतील कार्यकर्ते उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर वस्तीसुधार योजनेतंर्गत ५ कोटी मंजूर
## वंचित घटकाला सोयीसुविधा मिळण्यास होणार मदत : आ.सचिन कल्याणशेट्टी


अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्तीसुधार योजनेतंर्गत विविध गावातील ५६ कामासाठी ५ कोटी रुपये निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे. राज्यातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील घटकांच्या वस्त्यांचा तसेच गावांचा विकास करण्यासाठी या घटकांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांना शासनस्तरावरुन मान्यता देण्यासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अशी राज्यस्तर योजना सन २०१८-१९ पासून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला होता. त्याला अनुसरून आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी एकूण ५६ वेगवेगळ्या कामांसाठी निधीचा प्रस्ताव दिला होता. त्या अनुषंगाने एकूण ५ कोटींचा निधी मंजूर झाला आहे.



मंजूर झालेली कामे आणि त्याला मिळालेला निधी पुढीलप्रमाणे : आळगे दोन कामे (१२) लाख , समर्थनगर दोन कामे (२०) लाख, गळोरगी (१०) लाख, हत्तीकणबस (८) लाख, जेऊर (८) लाख, गोगांव दोन कामे (२०) लाख, कुंभारी चार कामे (३१) लाख, धारसंग (१०) लाख, कडबगांव (८) लाख, आंदेवाडी ज. (८) लाख, आंदेवाडी ज. (१०) लाख, रामपुर लाख, बोरगाव (८) लाख, खानापूर दे. (१०) (८) लाख, उडगी (१५) लाख, घोळसगाव (१०) लाख, सलगर (१०) लाख, संगदरी (१०) लाख, रुद्देवाडी (१०) लाख, संगोगी (८) लाख, आचेगाव तीन कामे (२४) लाख, बिंजगेर (८) लाख, कासेगाव (८) (१५) लाख, तांदुळवाडी लाख, मुळेगाव दोन कामे (१८) लाख, भुरीकवठे (८) लाख, रामपुर (६) लाख, अरळी दोन कामे (१८) लाख, हन्नूर तीन कामे (३०) लाख, किणी (१०) लाख, दर्शनाळ (८) लाख, बोरेगाव (१०) लाख, चुंगी (१०) लाख, सुलतानपुर (८) लाख, बऱ्हाणपुर दोन कामे (१६) लाख, बागेहळ्ळी (१०) लाख, शिरवळ दोन कामे (२०) लाख, काझीकणबस (८) लाख, केगाव (८) लाख, अंकलगे (८) लाख, मुंढेवाडी (८) लाख, हैद्रा (१०) लाख अशा एकूण ५६ कामाकरिता ५ कोटी निधी मिळालेला आहे. याने ग्रामीण भागातील वंचित घटकांच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी मिळाल्याने चालना मिळणार आहे. सदर निधी मंजुरी कामी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी स्पष्ट केले आहे.

## गौडगाव जागृत मारुती मंदिरात भाविकांची गर्दी
### हंजगीचे पाटील कुटुंबाकडून अन्नछत्र मंडळात महाप्रसाद

अक्कलकोट/प्रतिनिधीः अधिक मास महिन्याच्या शनिवारी गौडगाव येथील जागृत मारुती मंदिरात भाविक,भक्तांनी मारुतीच्या दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.या मास महिन्यात,



मारुतीच्या नावाने अन्नदान केल्यास पुण्य प्राप्त होत असते.अशी भाविकांची श्रद्धा आहे.मारुती भक्त बसवराज पाटील व कुटुंबीयांकडून श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आला होता.यावेळी हजारो भाविक भक्तांनी महाप्रसादाने तृप्त झाले .

गौडगावच्या पुरातन हेमांडपंती जागृत मारूती मंदिरात मारूतीचा मंत्रोचारात अभिषेक, होमहवन, शनिपुजा,महाआरती विविध पूजा भक्ताच्या साक्षीने पार पडला.या पूजेसाठी मोठ्या संख्येने भाविकांनी गर्दी केली होती.गौडगांव अन्नछत्र मंडळात मारूतीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविक भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.दक्षिणमुखी जागृत मारूतीच्या दर्शनासाठी महाराष्ट्र, कर्नाटक व इतर राज्यातून आलेले हजारो भाविकांनी महाप्रसाद घेण्यासाठी पहाटे पासून मंदिरात अलोट गर्दी केली होती.राज्य परराज्यातून आलेल्या भाविक भक्तांचे रिग दिवसभर पाहायला मिळाला.यावेळी अध्यक्ष श्रीकांत खानापुरे,कार्याध्यक्ष सिद्राम वाघमोडे,सचिव प्रकाश म्हेथें,ज्ञानेश्वर फुलारे,शांतय्या स्वामी,बिरप्पा पुजारी आदी विश्वस्तांनी परिश्रम घेतले.

अक्कलकोट तालुक्यातील गौडगांव येथील जागृत मारुती मंदीरात दर्शनार्थींची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असुन महाप्रसादाची उत्तम सुविधा देण्यात येत आहे.पहाटेपासून ते सायंकाळी,रात्री उशिरापर्यंत पोटभर महाप्रसाद दिला जातो.भाविक याचा लाभ घेत आहेत.या सुविधेमुळे भाविकानी समाधान व्यक्त करित आहे.श्री जागृत मारुती देवस्थानाकडून भाविकांना उत्तम सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न

**– सिद्धाराम वाघमोडे, श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळ गौडगांव**

दर तीन वर्षांनी येणाऱ्या अधिक मास महिन्यात मारुती मंदिरात दानधर्म केल्याने पुण्य प्राप्त होत असते.अशी श्रद्धा आहे.यानिमित्ताने गौडगाव येथील श्री जागृत मारुतीच्या अन्नछत्र मंडळात महाप्रसादाच्या स्वरूपात अन्नदान केला आहे.अन्नदान केल्याने मनाला सुख, समाधान,शांती मिळते.

**– बसवराज पाटील –हंजगी मारुती भक्त.**

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सोलापूर जिल्हा दौरा

सोलापूर/प्रतिनिधीः राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिनांक १३ ऑगस्ट २०२३ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे राहील.रविवार, दिनांक १३ ऑगस्ट २०२३ रोजी दुपारी १२.४० वाजता सोलापूर विमानतळ येथे आगमन. दु. १२.४५ वाजता विमानतळ येथून न्यू इंग्लिश स्कूल, ज्युनिअर कॉलेज व डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला कडे प्रयाण. दुपारी २.१५ वाजता न्यू इंग्लिश स्कूल ज्युनियर कॉलेज, डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालय सांगोला येथे आगमन व राखीव. दुपारी २.३० वाजता स्व. डॉ. गणपतराव देशमुख स्मारक अनावरण व महाविद्यालय नामांतर सोहळा उपस्थिती. सायंकाळी ४.०० वाजता मोटारीने सोलापूर विमानतळ कडे प्रयाण. सायंकाळी ५.३५ वाजता विमानाने मुंबईकडे प्रयाण.



## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
– स्वामी विवेकानंद

# संपादकीय

## मुळापर्यंत जाण्याची गरज..

इस्लामिक राजवट आणण्याच्या एकमेव उद्देशाने कार्यरत असलेली इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सीरिया म्हणजेच इसिस ही दहशतवादी संघटना भारताच्या भूमीवरसुध्दा कार्यरत असल्याचे पुरावे यापूर्वी मिळाले आहेतच. आता नव्याने घडलेल्या काही घडामोडींमुळे इसिस संघटना भारतात पुन्हा एकदा पाय रोवण्यासाठी जोमाने प्रयत्न करत असल्याचे पुरावेही मिळत आहेत. ज्या प्रकारे गेल्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्रात पुणे, भिवंडी आणि इतर काही ठिकाणी इसिसशी संबंध असण्याच्या संशयावरून काही लोकांना अटक करण्यात आली आहे. ते पाहता हा विषय निश्चितच गंभीर मानावा लागणार आहे. पुणे आणि इतर परिसरात ज्या लोकांना अटक करण्यात आली त्यांच्या कार्यपध्दतीचे वर्णन इसिसचे महाराष्ट्र मॉड्युल असे करण्यात येत आहे. पुणे, भिवंडी आणि इतर ठिकाणी ज्या लोकांना अटक करण्यात आली त्यांच्याकडे जी सामग्री मिळाली आहे ती पाहता त्यांचे इरादे निश्चित स्पष्ट होत आहेत. अशा प्रकारच्या घटनांची चौकशी करणारी सर्वोच्च संस्था म्हणजेच एनआयए आणि दहशतवादावर नियंत्रण ठेवण्याचे काम करणारी संस्था एटीएस या दोन्ही संघटनांनी संयुक्तपणे केलेल्या कारवाईमध्ये या लोकांच्या जरी मुसक्या आवळण्यात आल्या असल्या तरी इसिसशी अशाप्रकारे सहानुभूती बाळगणाऱ्यांची संख्या जास्त असू शकते. या सहा लोकांकडे जे साहित्य मिळाले आहे त्यामध्ये बॉम्ब तयार करण्याची कृती किंवा बॉम्ब तयार करण्याचे साहित्य त्याचबरोबर भारतातील विविध शहरांना मार्क करणारा एक नकाशाही मिळाला आहे. म्हणजेच याच शहरांमध्ये बॉम्बस्फोट घडवण्याचा कट रचण्यात येत होता. देश व राज्यात आगामी काळात गणेशोत्सव आणि नवरात्रीसह विविध सणांची धामधूम सुरू होणार आहे. या कालावधीमध्ये गर्दी होण्याचे प्रमाण वाढत असल्याने त्याचाही फायदा अनेक वेळा दहशतवादी संघटनांकडून घेतला जातो. उत्सवाच्या कालावधीमध्ये झालेली एखादी दहशतवादी घटना जास्त परिणामकारक ठरत असते. परिणामी तपास यंत्रणांना पुण्यात पकडण्यात आलेल्या सहा दहशतवाद्यांच्या माध्यमातून इसिसच्या कटकारस्थानाच्या मुळापर्यंत जाण्याची गरज आहे.

## असा ओळखा भगवान बुद्ध आणि महावीर मूर्तीमधील फरक

भगवान बुद्ध आणि महावीर दोघेही समकालीन होते. बुद्धांचा जन्म बिहार–नेपाळ सीमेजवळ असलेल्या लुंबिनी मध्ये झाला तर महावीर यांचा जन्म बिहार मधील वैशाली येथे झाला. महावीर यांचा जीवनकाल इ.स.पूर्व ५४० ते ४६८ असा मानला जातो. तर भगवान बुद्धांचा जीवनकाल इ.स.पूर्व ५६३–४८३ असा मानला गेला आहे. त्या काळात प्रामुख्याने श्रमण आणि वैदिक संस्कृती अस्तित्वात होती.

भगवान बुद्ध व महावीर दोघेही राजपुत्र होते. बुद्धांनी २९ व्या वर्षी राज्य सोडले, तर महावीर यांनी ३० व्या वर्षी राज्य सोडले. सिद्धार्थ गौतम यांना ज्ञानप्राप्ती झाल्यावर 'भगवान बुद्ध' म्हटले गेले. भगवान महावीर यांना 'निगन्ठ नाथपुत्त' म्हणत होते. शरीराला क्लेश देऊन शुद्धी, मोक्ष साधता येऊ शकते असे त्यांचे मत होते. तर बुद्धांनी मध्यम मार्ग अनुसरून अष्टांगिक मार्गाची शिकवण जगाला दिली. महावीर यांचे निर्वाण वयाच्या ७२ व्या वर्षी पावापुरी, बिहार येथे झाले तर भगवान बुद्ध यांचे महापरिनिर्वाण ८० व्या वर्षी कुशिनारा, उत्तर प्रदेश येथे झाले.

**महावीर मूर्तीशिल्प आणि श्रीवस्त्य चिन्ह**

त्यांच्या नंतर शिष्यांद्वारे त्यांची शिकवण भारतात सगळीकडे हळूहळू पसरू लागली. चारशे वर्षानंतर भगवान बुद्धांची प्रतिमा मूर्ती आणि शिल्पांद्वारे घडविणे चालू झाले. तसेच महावीर यांचीही मूर्ती घडविली जाऊ लागली. दोघेही श्रमण संस्कृतीतील असल्याने त्यांच्या मूर्ती या ध्यानमुद्रा अवस्थेतील घडविल्या गेल्या.

**पार्श्वनाथ तीर्थंकर, पार्श्वनाथ तीर्थंकर यांची उभी मूर्ती**

बुद्धांची आणि महावीरांची मूर्ती या दोन्ही सारख्याच दिसत असल्या तरी त्यातील सूक्ष्म फरक हा सामान्यांना लवकर आकलन होत नाही. यामुळे भगवान बुद्धांच्या मूर्तीला महावीरांची मूर्ती समजले जाते. काहीतर मुद्दामहून बुद्धमूर्तीला बेलाशक महावीर यांची सांगून लोकांत भ्रम पसरवितात. असंख्य सामान्य वाचक या मुळे गोंधळून जातो. यास्तव दोघांच्या मूर्तीमध्ये व



शिल्पाकृतीमध्ये काय फरक आहे ते खालील प्रमाणे स्पष्ट करण्यात येत आहे.

१) भगवान बुद्ध यांची मूर्ती घडविताना अंगावर नेहमी चिवर परिधान केलेले दाखविले जाते. मात्र महावीर यांची ध्यानस्थ मूर्ती ही वस्त्रहीन दाखविण्यात येते. हा पहिला महत्वाचा फरक आहे.

२) भगवान बुद्धांची मूर्ती व शिल्प यावर चिवर वस्त्र परिधान केल्याची खूण म्हणून खांद्या पासून कमरेपर्यंत आडव्या धाग्यासारखी वस्त्र किनार दाखविलेली आढळते. महावीरांच्या मूर्तीवर ही वस्त्रांची कडा दिसून येत नाही. हा महत्वाचा सूक्ष्म फरक अनेकांच्या लक्षात येत नाही.

३) महावीर आणि भगवान बुद्ध या दोघांच्याही ध्यानस्थ मुद्रेमध्ये डाव्या हातावर उजवा हाथ ठेवलेला आढळतो. मात्र महावीरांच्या छातीवर श्रीवत्सं चिन्ह ( कमलपुष्प ) दर्शविलेले असते. तसे भगवान बुद्धांच्या मूर्तीच्या शरीरभागावर बिलकुल आढळत नाही. हा दुसरा महत्वाचा फरक आहे.

मध्यप्रदेशमध्ये दोन वर्षांपूर्वी मिळालेल्या महावीर आणि तीर्थंकारांच्या मूर्ती

४) भगवान बुद्धांच्या शिरावर केश उश्नी ( गोलाकार केशगाठ किंवा चुंबळ) दिसून येते. तशी महावीरांच्या शिरावर दिसून येत नाही. काही मूर्तीवर जरी ती दिसून आली तरी ती बुद्धांसारखी मोठी ठळक नसते.

५) कमलपुष्प आणि त्रिरत्न ही बौद्ध संस्कृतीची महत्त्वाची चिन्हे आहेत. भगवान बुद्ध यांची मूर्ती ही नेहमी कमलपुष्पात व पद्मासनात असते. व तीच्या विविध मुद्रा दाखविल्या जातात. महावीरांची मूर्ती फक्त पद्मासनात ध्यानस्थ दाखविली जाते. हा एक तिसरा महत्वाचा फरक आहे.

प्राचीन बुद्धमूर्ती – चिवर वस्त्रांची कडा दिसत आहे.

६) उभी असलेल्या अवस्थेतील बुद्धमूर्तीच्या हातात भिक्षापात्र असते किंवा विविध मुद्रा दाखविली जाते. मात्र महावीरांची आणि अनेक तीर्थंकारांची मूर्ती ही वस्त्रहीन आणि दोन्ही हात बाजूला सरळ ठेवलेल्या अवस्थेत असतात. हा चौथा महत्वाचा फरक आहे.

७) भगवान बुद्धांच्या कानाच्या पाळ्या खांद्यापर्यंत आलेल्या दाखविल्या जातात. बत्तीस लक्षणांपैकी ते एक लक्षण आहे.तसे महावीरांचे दाखविले जात नाही.उत्खननात मिळालेली दक्षिण भारतातील बुद्धमूर्ती

८) महावीर आणि तीर्थकांरांच्या मूर्तीजवळ सिंह आणि शंख दाखविला जातो. भगवान बुद्धांच्या प्रतिमेजवळ सिंह आणि शंख नसतात. हा पाचवा महत्वाचा फरक आहे.

ह्या व्यतिरिक्त सुद्धा बुद्धमूर्ती आणि महावीर मूर्ती यामध्ये काही महत्वाचे फरक असल्यास वाचकांनी जरूर सांगावेत. म्हणजे काहीजण बुद्धमूर्तीला महावीर मूर्ती असल्याचा भ्रम पसरवितात त्याला आळा बसेल.

**संजय सावंत,**
**नवी मुंबई**
**(लेखक – ज्येष्ठ बौद्ध इतिहास अभ्यासक)**

# वाबळेवाडीचे ३३ विद्यार्थी शिष्यवृत्तीत चमकले,
## सचिन बेंडभर आणि तुषार सिनलकर यांची दमदार कामगिरी

पुणे : १२ फेब्रुवारी २०२३ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत वाबळेवाडी शाळेचे तब्बल ३३ विद्यार्थी गुणवत्ताधारक झाले असल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल पवार यांनी दिली.



महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदे मार्फत घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला. यात शाळेचा इयत्ता पाचवीचा निकाल ९३.६२% लागला असून एकूण ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी १३ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले आहेत. इयत्ता पाचवीसाठी एकनाथ पाराजी खैरे व सचिन शिवाजीराव बेंडभर यांनी या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले होते.

**इयत्ता पाचवीत** जिल्हा गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी व त्यांचे गुण कंसात दिले आहेत :

प्रयाग पांडुरंग राऊत (२६८), युवराज नवनाथ भुजबळ (२६८), देवेन अविनाश कदम (२६६), श्रद्धा सचिन नळकांडे (२५८), श्रावणी उमराव भालेराव (२५६), मयंक शाहू मगर (२५४), निधी राहुल भालशंकर (२५४), अद्विका मारोती वरठे (२४६) स्विनल श्रीकांत पाटील (२४६) सई दत्तात्रेय साकोरे (२४२), मनिष गोकुळ मंडलिक (२४०), साईराज अशोक कोठावळे (२४०), वेदांत नागनाथ लिमकर ( २३८) हे विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत चमकले आहेत.

शाळेचा इयत्ता आठवीचा निकाल ८८.२४% लागला असून एकूण ३४ पैकी ३० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यापैकी इयत्ता आठवीचे ३ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आले असून १७ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले आहेत.

**इयत्ता आठवीत राज्य गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी :** साक्षी खंडू वाबळे २८२(राज्यात तिसरी), प्रज्वल गोरक्ष तांबे २८०(राज्यात पाचवा ), रिया सचिन वाबळे २६०( राज्यात तेवीसावी) या तीन विद्यार्थ्यांना राज्यात येण्याचा बहुमान मिळाला. आठवीसाठी तुषार अशोक सिनलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे.

**इयत्ता आठवीत जिल्हा गुणवत्ता यादीत आलेले विद्यार्थी :** आश्लेषा नितीन भुजबळ (२४८), समीक्षा उत्तम मासळकर (२४६), आयुष अरुण कुमावत (२४४), शर्वरी प्रकाश बांगर (२४४), खुशी युवराज मांढरे २३०, गिरिराज संदीप सूर्यवंशी (२२४), गौरव संतोष भोसूरे (२१८), निर्जला सतीश बांगर (२१६), स्वराली भरत नावगिरे (२१४), निसर्ग बंडू वाबळे (२१०), वैष्णवी संतोष भिकका (२०८), संस्कृती संतोष धुमाळ (२०६), सोहम दीपक नाईकधुरे (२०४), यश संतोष गवारे (२०२), तनिष्का विठ्ठल टेमगीरे (१९६), ज्ञानेश्वरी बापू वाबळे (१९६), सृष्टी नवनाथ काळे (१९२), सार्थक रमाकांत शिवले (१९०) या विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत घवघवीत यश मिळवले. निकाल जाहीर होताच शाळेने यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचा सत्कार केला.

याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल पवार, उपमुख्याध्यापिका शरिफा तांबोळी, शिरूर तालुका प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन व शिष्यवृत्ती तज्ञ विजय गोडसे, सुनिल पलांडे, जयश्री पलांडे, किरण अरगडे, गोरक काळे, प्रतिभा पुंडे, दीपक खैरे, तुषार सिनलकर, पोपट दरंदले, विद्या सपकाळ, वैशाली जगताप, गितांजली वाघोले, अंगणवाडी सेविका सिता मिसाळ, अंगणवाडी मदतनीस भाग्यश्री जाधव आणि साहित्यिक शिक्षक सचिन बेंडभर उपस्थित होते.

तर शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संदीप वाबळे, उपाध्यक्ष मल्हारी वाबळे, ग्रामपंचायत सदस्य प्रकाशकाका वाबळे, माजी सरपंच केशव वाबळे, यात्रा कमिटीचे अध्यक्ष अंकुश वाबळे, सतिश वाबळे, सुरेखा वाबळे, सतिश कोठावळे, प्रकाश विठ्ठल वाबळे, भगवान वाबळे, खंडू वाबळे, काळूराम वाबळे आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. ार्यक्रमाचे सुत्रसंचालन विजय गोडसे यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल पवार तर आभार पोपट दरंदले यांनी मानले.वाबळेवाडी शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल सणसवाडी केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र टिळेकर, शिक्रापूर केंद्राचे केंद्रप्रमुख प्रकाश लंघे, विस्तार अधिकारी वंदना शिंदे, गटशिक्षणाधिकारी अनिल बाबर यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे.

पान १ वरुन

## पुण्यातील वाहतूक कोंडी दूर..

मोठ्या प्रकल्पांवरील खर्च आणि वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे. पुण्यात हवेतून चालणाऱ्या एअर बसेसबाबतही पर्याय म्हणून अभ्यास करावा. पुण्यातील ऑटो रिक्षांना नवे परवाने देताना इलेक्ट्रिक आणि इथेनॉलवर चालणाऱ्या रिक्षांना परवाने दिल्यास प्रदूषण कमी होईल.

ग्रीन हायड्रोजन हे भविष्य असल्याने शहरातील कचऱ्यावर प्रक्रिया करून ग्रीन हायड्रोजन तयार करण्याचा विचार व्हावा. पुण्यातील सर्व कचऱ्याचे विलगीकरण करून पुणे चक्राकार मार्गासाठी वापरल्यास कचऱ्याची समस्या दूर होईल. पुण्यातील अशुद्ध पाणी शुद्ध करून उद्योग, शेती आणि रेल्वेला दिल्यास जलप्रदूषण दूर होण्यास मदत होईल. शहरातील वाहतूक समस्या दूर करण्यासाठी पायाभूत सुविधा मजबूत करण्यासोबत शहरातील प्रदूषण दूर करण्यावर अधिक भर द्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

राज्य शासनाने नगरोत्थान योजनेच्या माध्यमातून सोलापूर, पुणे आणि नाशिक सारख्या शहरातील रस्ते प्रकल्पाच्या कामांसाठी भूसंपादन वेगाने झाले. चांदणी चौकातील प्रकल्पासाठीही या निर्णयाचा उपयोग झाला. विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनीही चांगले काम केल्याचे श्री.गडकरी म्हणाले.

**एकात्मिक वाहतूक व्यवस्था गरजेची–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यामुळे प्रवाशांच्या संख्येत वाढ होत आहे. पुणे मेट्रोने 'पुणे वन कार्ड' द्वारे चांगली सुरुवात केली आहे. हे कार्ड पीएमपीएमएललाही लागू होईल अशी व्यवस्था केल्यास त्याची उपयुक्तता वाढेल. भविष्यात देशातील इतर मोठ्या शहरातही या कार्डचा उपयोग होऊ शकेल. पुण्यात एकात्मिक वाहतूक व्यवस्था निर्माण करून ५०० मीटर वर नागरिकांना विविध वाहतूक पर्याय दिल्यास ते सार्वजनिक वाहतुकीचा जास्त उपयोग करतील. आता स्मार्ट सिस्टीम तयार करण्यात येणार असल्याने बसेसची वेळ, स्थान, प्रवासी संख्याही कळू शकेल. पुण्यात १० किलोमीटर जाण्याचा वेळ ३० ते ४० मिनिटे आहे. ही वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम करावी लागेल. पुण्यातून वेगवेगळ्या शहरात जाणाऱ्या रस्त्यांमुळे शहरात वाहतूक कोंडी होते. उन्नत रस्ते तयार करून ही समस्या दूर करता येईल. केंद्रीय मंत्री श्री.गडकरी यांनी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली असून यासाठी राज्य शासनही यासाठी आपला वाटा उचलेल.

चांदणी चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी आणि प्रकल्पाच्या आवश्यक भूसंपादनासाठी महानगरपालिकांना निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. कात्रज–कोंढवा रस्त्याच्या कामासाठी आवश्यक भूसंपादनासाठीही निधी देण्यात आला आहे. पुण्यात पायाभूत सुविधांचा विकास झाल्यास या भागात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होईल. त्यादृष्टीने पुण्यात नवे विमानतळ होणे गरजेचे आहे. पुरंदरला विमानतळ होण्यासाठी केंद्र सरकारच्या सर्व मान्यता मिळाल्या आहेत. भूसंपादनासाठी लवकरच स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांना विश्वासात घेण्यात येईल. पुण्यातील अनेक क्लस्टरसाठी हे कार्गो वरदान ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुळा मुठा शुद्धीकरण प्रकल्पामुळे शहरातील आणि शेतीसाठी पाण्याची समस्या दूर होईल. पुण्यातील कचरा व्यवस्थापन आणि विविध विकास प्रकल्पाच्या माध्यमातून भविष्यात पुणे देशातील सुंदर आणि राहण्यायोग्य शहर होईल, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

**मेट्रोच्या कामांना गती देणार–उपमुख्यमंत्री अजित पवार**

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, चांदणी चौकातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. केंद्र सरकारच्या सहकार्यामुळे ही समस्या दूर करण्यात यश आले. भूसंपादनासाठी जिल्हा प्रशासनानेही चांगले प्रयत्न केले. राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण, पोलीस आणि नागरिकांचेही सहकार्य लाभले. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातील मेट्रोच्या कामालाही गती देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. वनाज ते चांदणी चौक आणि वाघोलीपर्यंतही मेट्रो कमीत कमी कालावधीत पोहोचवायची आहे. पुणे शहराला जोडणाऱ्या रस्त्यांवर उड्डाणपूल उभारण्यासाठी केंद्रीय मंत्री गडकरी यांनी शहरातील पूल बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविल्याने पुणे शहराला त्याचा लाभ होणार आहे. पुणे परिसरात मोठ्या प्रमाणात उद्योग येत असल्याने रस्ते, मेट्रो, विमान वाहतूक अधिक सक्षम करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी नागरिकांचे सहकार्य आवश्यक आहे. पुणे अंतर्गत चक्राकार मार्गाची जबाबदारी केंद्र सरकारने घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राज्य शासन आणि पुणेकर यासाठी सर्व सहकार्य करतील असेही श्री.पवार म्हणाले

**एनडीए चौकतील प्रकल्पामुळे वाहतूक कोडी दूर होण्यास मदत–पालकमंत्री** पालकमंत्री श्री.पाटील म्हणाले, एनडीए चौकातील एकात्मिक सुविधा प्रकल्प मुंबईहून बंगळुरूकडे जाणाऱ्या प्रवाशांना उपयुक्त ठरण्यासोबत शहरातील वाहतूक कोंडी दूर होण्यास उपयुक्त ठरणार आहे. शहरात मेट्रोचा दुसरा टप्पा सुरू झाला असून त्याला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद आहे. मेट्रोच्या अधिकाऱ्यांनी सकाळी ६ पासून मेट्रोची फेरी सुरू केल्यास सकाळी रेल्वेने जाणाऱ्या प्रवाशांना फायदा होईल. राज्यात १८ हजार किलोमीटर लांबीचे महामार्ग झाले आहेत , असे त्यांनी सांगितले.

**महाराष्ट्राच्या विकासात रस्त्यांची भूमिका महत्वाची–डॉ.नीलम गोऱ्हे** विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.गोऱ्हे म्हणाल्या, रस्ते बांधणीच्या माध्यमातून देशाची बांधणी होत आहे. विशेषतः दुर्गम भागात विविध सुविधा पोहोचविण्यासाठी रस्ते उपयुक्त ठरतात. अशा रस्त्यांमुळे जागतिक पातळीवर देशाची प्रतिमा उंचावत आहे. महाराष्ट्राच्या विकासातही रस्त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. एनडीए चौकातील प्रकल्पामुळे नागरिकांना चांगली सुविधा झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

महामार्गावर महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्यात यावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार भीमराव तापकीर यांनीही मनोगत व्यक्त केले. केंद्र आणि राज्याने प्रकल्पासाठी पुरेसा निधी दिल्याने चांदणी चौकातील रस्ते प्रकल्प पूर्ण होऊन वाहतूक कोंडी दूर होण्यास मदत झाली असे त्यांनी सांगितले.

प्रास्ताविकात भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रादेशिक अधिकारी अंशुमाली श्रीवास्तव यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

महामेट्रोतर्फे तयार करण्यात आलेल्या 'पुणे वन कार्ड'चे लोकार्पणही यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाला राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर, खासदार श्रीरंग बारणे, आमदार उमा खापरे, दिलीप मोहिते पाटील, माधुरी मिसाळ, राहुल कुल, सुनिल कांबळे, संजय जगताप, सिद्धार्थ शिरोळे, विभागीय आयुक्त सौरभ राव, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक संजय कदम आदी उपस्थित होते.

**असा आहे एकात्मिक पायाभूत सुविधा व रस्ते विकास प्रकल्प**

पुणे शहरात एनडीए चौकातील राष्ट्रीय महामार्ग क्र.४८ वर सर्व मार्गिकांसहित एकूण १६.९८ किलोमीटर लांबीचा पायाभूत सुविधा व रस्ते विकास प्रकल्प उभारण्यात आला आहे. प्रकल्पाची किंमत ८६५ कोटी असून प्रकल्पामुळे परिसरात अखंड आणि वाहतूक कोंडीमुक्त रस्त्यांचे जाळे तयार झाले आहे.

## रुग्णांना जेनेरिक औषधं लिहून

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या नवीन नियमानुसार, आता डॉक्टरांना प्रिस्क्रिप्शन लिहून देताना जेनेरिक औषधं लिहून द्यावी लागतील. तसेच कोणतीही ब्रँडेड जेनेरिक औषधं लिहीण टाळावं लागणार आहे. याचाच सोपा अर्थ म्हणजे डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शन लिहिताना संबंधित आजारावर रुग्णांना कोणता औषधाचा फॉम्युर्ला आवश्यक आहे, फक्त याचा उल्लेख करावा. कोणत्याही जेनरिक औषधांच्या ब्रँडचा उल्लेख करुन नये. डॉक्टरांना आता हे निय पाळावे लागणार आहेत, असे न केल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. यामुळे काही काळासाठी संबंधित डॉक्टरांचा परवानाही रद्द होऊ शकतो.

## आसाममध्ये 'जलप्रलय'!

स्थलांतराचं कार्य प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.पुरामुळे फक्त माणसंचं नाही तर जनावरांनाही फटका बसला आहे. पुरामुळे सुमारे २०,००० हजार जनावरांना फटका बसला आहे. गेल्या २४ तासांत मुसळधार पाऊस आणि पूरस्थितीमुशे धेमाजी जिल्ह्यातील रस्ते आणि पुलांची दुरावस्था झाली आहे.

आसाम राज्य आपत्ती व्यवस्थापन आणि स्थानिक प्रशासनामार्फत पूरग्रस्त भागात मदत आणि बचावकार्य सुरु आहे. नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्यासोबतच त्यांना अन्न पुरवण्याचं काम प्रशासनानाकडून सुरु आहे.

आसाममध्ये पुरामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. अतिवृष्टी आणि पुरामुळे अनेकांचा मृत्यू देखील झाला होता. तसेच शेतकऱ्यांच्या शेतजमिनीसह घरांचं देखील मोठं नुकसान झालं.

केंद्र सरकारनं आसाम राज्यातील पूर ही 'गंभीर नैसर्गिक आपत्ती' म्हणून घोषित केल्याची माहिती आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी दिली होती. केंद्र सरकारकडून बाधित लोकांचे पुनर्वसन करण्यात येणार असून, सरकार पुनर्वसनाचा ९० टक्के खर्च उचलणार असल्याची माहिती सरमा यांनी दिली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# आदिवासी कातकरी मुला मुलीची अनुदानित आश्रमशाळा बाबरे येथे आर्ट्स, सायन्स व कॉमर्स ज्युनिअर कॉलेज सुरु करण्यासाठी प्रयत्न करणार : प्रा.जोगेंद्र कवाडे

शहापूर/ ठाणे : आदिवासी कातकरी मुला मुलींची अनुदानित आश्रमशाळा बाबरे ता. शहापूर येथे ऑइल अँड नॅचरल गैस कॉर्पोरेशन कंपनी अंतर्गत कंप्युटर ट्रेनिंग सेंटरचे उद्घाटन प्रा.जोगेंद्र कवाडे सर माजी खासदार लोक सभा, माजी आमदार व पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीयअध्यक्ष यांच्या शुभहस्ते करण्यात आले या प्रसंगी फक्त कातकरी मुला- मुलीची आश्रमशाळा हा आदिम जातीच्या एका जमातीला समाज्याच्या मुख्य प्रवाहात आणणारा शैक्षणिक प्रकल्प आहे असे काम करणाऱ्या ए. बी. एम. समाज प्रबोधन संस्थेचे अध्यक्ष व पदाधिकारी यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. मात्र येथील मुलाना पुन्हा दहावीनंतर शैक्षणिक सुविधा या विभागात सहजगत्या मिळत नाहीत आणि यामूळे गळती सुरु होते म्हणूनच या शाळेमध्ये कातकरी विध्यार्थीसाठी आर्ट्स, सायन्स व कॉमर्स कॉलेज पुढील वर्षापासून सुरू करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे पीपल्स रिपब्लिकन पार्टी च्या माध्यमातून मी प्रयत्न करून मंजुरी मिळवून देईल असे जाहीर आश्वासन दिले.

या पुढे बोलताना ते म्हणाले , या वैविध्यपूर्ण शैक्षणिक प्रकल्पामध्ये ठाणे, पालघर व नाशिक जिल्हयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी आहेत याचेही कौतुक केले आपला विकास शिक्षणाशिवाय होऊ शकत नाही हे आपल्या परिवर्तनाचे महानायक शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिबा फुले यांनी वेळोवेळी चळवळी उभ्या करून सिद्ध केले आहे. या महानायकाचा वसा घेऊन या संस्थेचे संस्थापक सिताराम गायकवाड गेली ४० वर्षे काम करीत आहेत. त्यांचे अभिनंदन करतानाच त्यांनी युवा पिढीकडे संस्थेचा कारभार सोपवून सध्या सर्वत्र सत्ता संघर्षाचे वारे वाहत असताना सिताराम गायकवाड यांनी एक नवीन आदर्श घालून दिला आहे. असे मला वाटते यावेळी ONGC चे अनुसूचित जनजाती व कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष जागेश सोमकुअर यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की त्याच्या संघटनेच्या माध्यमातून कंपोनंट प्लॅन च्या अंतर्गत ते अनेक संस्थांना मदत करतात मात्र सिताराम गायकवाड व त्यांची संस्था गेली अनेक वर्ष जेव्हढी आमची मदत त्या ही पेक्षा तो प्रकल्प होण्यासाठी इतर मदतही गोळा करून शोषितांच्या शिक्षणासाठी काम करीत आहेत व म्हणून एक महिन्यापूर्वीच जछत्रछ च्या माध्यमातून आम्ही डॉ. जब्बार पटेल यांच्या शुभ हस्ते जीवनगौरव पुरस्कार देऊन त्याचा सन्मान व सत्कार केलेला आहे. कोरोना मध्ये केलेले उत्कृष्ट काम व मल्टिनॅशनल कंपनीच्या मदतीने शाळेची भव्य इमारत उभी करून परिवर्तनाच्या नवी दिशा व नवीन आशा भावी पिढीसाठी मिळणार आहे याची आम्हाला खात्री आहे. या प्रसंगी उल्हासनगर नगरपालिकेचे माजी कॉन्सीलर प्रमोद टाले, ए.बी.एम. संस्थेचे अध्यक्ष समीर गायकवाड, सरचिटणीस अतुल भडांगे, स्वप्नील जाधव संघटक



इ मान्यवरांची मार्गदर्शनपर भाषणे झाली.

या कार्यक्रमासाठी ONGC चे व्ही. टी वानखेडे, डी.डी. कटारे, व्ही.यु. गायकवाड, तसेच ए. बी .एम. संस्थेचे कार्याध्यक्ष आर. एस. जाधव, शीतल गायकवाड, पूनम भडांगे, सूर्यकांत भडांगे, संतोष पडवळ, सुशील जाधव ,जिल्हास्तरीय महिला दक्षता समितीच्या सदस्या तथा शाळेच्या मुख्याध्यापिका आशा नवनाथ रणखांबे तसेच आश्रम शाळेचे सर्व शिक्षक आणि कर्मचारी वृंद उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप पडवळ यांनी केले.

# भटक्या विमुक्त जाती जमातीच्या लोकांना त्यांच्या वस्तीत जावून कागद पत्र देणार: जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे



उस्माबाद/प्रतिनीधीः उस्मानाबाद जिल्ह्यातील भटक्या विमुक्त जाती जमातीच्या लोकांना त्यांच्या वस्तीत जाऊन आवश्यक ते सर्व कागपत्रांची पूर्तता करणार आहे असेउस्मानाबाद चे जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओंबासे साहेब यांनी सांगीतले

काल जिल्हाधिकारी कार्यालय उस्मानाबाद येथे ते भटक्या विमुक्त जाती जमातीच्या विविध प्रश्नावर चर्चा करीत असताना बोलत होते. यामध्ये आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदार नोंदणी, जात प्रमाण पत्र, व अनेकांना राहण्यासाठी स्व मालकीची जागा नाही त्यामुळे अनेक शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ त्यांना मिळत नाही यावर साहेबांनी चर्चा केली व त्यांच्या वस्तीवर जावून त्यांना सर्व कागपत्रांची पूर्तता करण्यासाठी विविध विभाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या व प्रत्येक तालुक्यात विशेष कॅप आयोजित करण्यास सांगितले. प्रत्येक तालुक्यात विविध भटक्या समाजाची वस्ती असलेली माहिती जाणून घेतली. पारधी समाजाच्या वस्त्या असलेली जिल्हयात १८४गावे आहेत. तर नाथपंथी डवरी गोसावी येडोळा, जळकोट, हंगरगा, बोरगाव, नळदुर्ग येथे वैदु समाज, मसणजोगी, मरीआई, पथरुड, हंगरगा तुळ येथे पारधी, बहुरुपी, तुळजापूर येथे ड क्कलवार समाज, उमरगा येथे मसणजोगी, डोंबारी, समाज व जिल्ह्यात अनेक गावात विविध जातीचे लोक आहेत ते मूलभूत हक्कापासून वंचित आहेत याची माहिती मारुती बनसोडे यांनी सांगितली तरअनिल काळे व नाना पवार पारधी समाजातील कार्यकर्त्यांनी समाजातील विविध समस्या सांगितल्या संजीव विभुते उमरगा तालुक्यातील समस्या सांगितल्या कसबे तडवळे येथील पारधी ३५ वर्षा पासून राहतात पण जागा त्यांच्या नावे नाही म्हणून त्यांना घरकुल अद्याप मिळाले नाही.

हंगरगा तूळ येथे बहुरुपी समाज २५ वर्षा पासून राहतो त्यांना ही घरकुल मिळाले नाही आशा अनेक समस्या जिल्हाधिकारी साहेबांनी ऐकून घेतल्या आहेत यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी,सहाय्यक समाज कल्याण उपायुक्त बाबासाहेब अरवत, आदिवासी प्रकल्प सोलापूरचे अधिकारी व अन्य अधिकारी तसेच पारधी समाजातील कार्यकर्ते मोठया संख्येनी उपस्थित होते.

# दया,क्षमा,शांती ज्याचे जवळ असते तोच खरा संत : नवले महाराज

अकोले/प्रतिनिधीः संत ओळखांचे लक्षण असतात. बाह्य रूपापेक्षा अंतर रंगाने ते कळतात, दया, क्षमा, शांती बाळगणारा खरा संत असतो असे मत अगस्ती देवस्थान ट्रस्ट पायी दिंडी सोहळा चे प्रमुख ह.भ.प. राजेंद्र महाराज नवले यांनी व्यक्त केले.

अगस्ती आश्रम अकोले येथे अधिकमास निमित्ताने आयोजित अखंड हरीनाम सोहळ्यात कीर्तन पुष्प गुफतांना

संत तोचि जाना जगी । दया क्षमा ज्याचे अंगी ।।

ताटी या प्रकरणातील मुक्ताबाई यांच्या अभंगावर नवले महाराज निरूपण करताना बोलत होते. याप्रसंगी संत साहित्याचे अभ्यासक गुरुवर्य डॉ अनिल सहस्त्रबुद्धे सर, अकोले तालुक्याचे लोकप्रतिनिधी आमदार डॉ किरण लहामटे, देवस्थान ट्रस्ट चे अध्यक्ष अड के.डी.धुमाळ, मनोहर महाराज भोर, दीपक महाराज देशमुख, गणेश महाराज वाकचौरे पांडुरंग महाराज फरगडे आदी उपस्थित होते

हभप नवले महाराज बोलताना म्हणाले की, आदिशक्ती मुक्ताबाईंचा




अधिकार मोठा होता. आईसाहेबांनी केलेला बोध आहे. अज्ञानाला बोध करणे सोपे असतं परंतु ज्ञान्याला शुद्धी वरती आणणे अवघड असते ज्ञानाला शुद्धीवरती आणण्याचे काम आदिशक्ती मुक्ताबाई यांनी केलं.

संत नामदेव महाराज, योगीराज चांगदेव महाराज व संत ज्ञानोबाराय यांना बोध करण्याचं काम मुक्ताबाई यांनी केलं असं गोड चिंतन महाराजांनी मांडल. सव्वा महिन्याच्या भक्ती उत्सवामध्ये हजारोच्या संख्येने भाविक दररोज किर्तन श्रवणासाठी येतात यावेळी अन्नप्रसादाची सेवा समस्त ग्रामस्थ माळीझाप यांच्या वतिने संपन्न झाली याप्रसंगी चंद्रकांत महाराज चौधरी विशाल महाराज वाघमारे इंद्रभान कोल्हाळ सर नितीन महाराज देशमुख संदीप महाराज सावंत ज्ञानेश्वर महाराज नाईकवाडी रोहित महाराज राक्षे दीपक महाराज साबळे काशिनाथ म्हशाळ पोपट दिवटे साहेबराव घुले या भजनी मंडळीनी संगीत साथ दिली.

# पत्रकाराना मारहान करणाऱ्या त्या माथेफिरू गावगुंडाला कडक शासन झालं पाहिजे

## नळदुर्ग येथील शहर पत्रकार संघाची मागणी




नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :जळगाव जिल्ह्यातील एका ग्रामीण भागामध्ये पाचोरा गावातील एक पत्रकार संदिप महाजन ज्यानी आपल्या लेखणीतून ग्रामीण भागातील सामाजिक उनिमा सक्षम ठेवण्यासाठी व ग्रामीण जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी अतिशय प्रभावी मांडणी करणे महत्वाचे असते आशाच पद्धतीने महत्वपूर्ण घटनांचे पडसाद उमटविण्यासाठी काय महत्त्वाच्या बातम्या छापली गेली परंतु या बातमीचा राग धरून काही माथेफिरू गावगुंडांनी बातमी का छापली म्हणून पत्रकार संदिप महाजनला रस्त्यावर खाली पाडून अश्लिल शिवीघाळ अर्वाच्य भाषेत बोलत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली या घटनेच्या निषेधार्थ नळदुर्ग शहर पत्रकार संघाच्या वतीने शहर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रियाज पटेल यांना निषेध निवेदन देऊन तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला .

अशा गावगुंडाला माथेफिरूला महाराष्ट्र शासनाने पत्रकार संरक्षण कायदा अंतर्गत कडक कारवाई करावी आणि त्या पत्रकार संदिप महाजनला योग्य तो न्याय मिळवून द्यावा अशी मागणी या निषेध निवेदना द्वारे केली आहे यावेळी नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे सचिव तानाजी जाधव जेष्ठपत्रकार विलास येडगे उत्तम बनजगोळे लतीफ शेख दादासाहेब बनसोडे पत्रकार मित्र अमर भाळे मुजम्मीर शेख भगवंत सुरवसे छोटे मामू आदिजन उपस्थित होते .




# निफाड नगर पंचायतीच्या नवीन वाहनांचे लोकार्पण

निफाड/प्रतिनिधी : स्वच्छ भारत अभियान व निफाड नगर पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड नगरपंचायतीच्या आरोग्य विभागाकरिता २ ट्रॅक्टर , २ थ्री व्हीलर पे, १ फोर व्हिलर टाटा एस व १ मोबाईल टॉयलेट शासनाच्या निधीमधून मंजूर झाले असून सदर मंजूर वाहने नुकतेच निफाड शहराच्या नगराध्यक्ष सौ रत्नमाला संपत कापसे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे, मुख्यधिकारी अमोल चौधरी ,आरोग्य सभापती साहेबराव बर्डे . पाणीपुरवठा सभापती संदीप जेउघाले , बांधकाम सभापती. किशोर ढेपले, महिला व बालकल्याण सभापती अरुंधती पवार,नगरसेविका कांताबाई कर्डीले.

कविता धारराव, शारदा कापसे,नगरसेवक सागर कुंदे संदीप शिंदे, मा नगरसेवक देवदत्त कापसे,नंदू कापसे,आसिफ पठाण,दीपक गजरे,गौतम ललवाणी वकील शेख तसेच नगरपंचायत अधिकारी व कर्मचारी व निफाड शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग भगिनींना साडीचोळी वाटप,

## अधिक महिन्यानिमित्त समाजसेवक हनुमंत मोरे यांचा उपक्रम



पंढरपूर/प्रतिनिधी:अधिक मासात अनेक पुण्यकर्मे करण्याचा रिवाज आहे. यानिमित्ताने कुणी देवदर्शन, अन्नदान यांसारखे उपक्रम राबवताना आढळतात. परंतु समाजसेवक हनुमंत मोरे यांनी समाज भगिनींना साडीचोळी वाटप करण्याचा रिवाज मांडला आहे. समाजातील दिव्यांग भगिनींना साडी चोळी वाटप करून त्यांनी, या घटकास उपकृत केले आहे.

हनुमंत मोरे हे पंढरपूर तालुक्यातील भोसे गावचे रहिवासी असून, त्यांची समाजसेवक म्हणून ओळख आहे. दुष्काळ असो की कोरोना काळ, समाजातील घटकांना त्यांची नेहमीच मदत राहिली आहे. दुष्काळात दलित बांधवांच्या वस्तीला स्वखर्चाने पाणीपुरवठा करण्याचे काम त्यांनी केले होते. या कामाची दखल संपूर्ण तालुक्याने घेतली होती. कोरोना काळात कोरोना रुग्णांना हॉस्पिटलमध्ये पोहोचवणे याशिवाय बेड मिळवून देणे अशी अनेक कामे त्यांनी केली होती. समाजातील गरजवंतांना मदत करण्याची त्यांची सवयच त्यांना कधी समाजसेवक बनवून गेली हे त्यांनाही कळले नसेल. सध्या अधिक मास सुरू आहे. पंढरपूर तालुक्यात या महिन्यास अधिक महत्त्व आहे. संपूर्ण जगाचा उद्धाता भगवान पांडुरंग पंढरपूरमध्ये असल्याने, अधिक मासाचे महत्त्व या तालुक्यात अधिक आहे. म्हणूनच श्री विठ्ठलाच्या दर्शनासाठी दररोज लाखो भाविक पंढरीत येत असतात. या मासात काहीतरी पुण्य कर्म करण्याची धडपड प्रत्येक जण करत असतो. समाजसेवक हनुमंत मोरे यांनी येथील दिव्यांग भगिनींना साडी चोळीचे वाटप करून, त्यांचा दुवा घेतला आहे. देव देवळात नसून प्रत्येकाच्या हृदयात आहे, हे त्यांनी त्यांच्या कृतीतून दाखवून दिले आहे.

# कोठुरेत सावरकर विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा संपन्न

निफाड/प्रतिनिधी :स्वातंत्र्यवीर सावरकर विद्यालय कोठुरे येथे पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मवीप्र संस्थेचे सभापती तथा स्कूल कमिटी अध्यक्ष सन्माननीय बाळासाहेब क्षीरसागर हे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली या वेळी व्यासपीठावर सभापती बाळासाहेब क्षीरसागर ,स्कूल कमिटी सदस्य विष्णू मोगल ,बाळासाहेब मोगल, प्रकाश टरले, ऍड विजय मोगल,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कदम आदी होते....

पाहुण्यांचे स्वागत शालेय गीत मंचाद्वारे स्वागत गीताने करण्यात आली असून प्रास्ताविकात मुख्याध्यापिका श्रीमती कदम यु के यांनी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाविषयी माहिती .व विविध स्पर्धा मागील वर्षीचा इयत्ता दहावीचा निकाल आणि गुणवत्तेतील प्रगती तसेच शालेय व बहिशाले उपक्रमाबाबत माहिती करून दिली या वेळी अध्यक्षीय मनोगतातून क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी शिक्षकांबरोबरच पालकांनी आपल्या पाल्याबरोबर तेवढेच सतर्क रहावे असे मत प्रकट केले..शिक्षकांची व पालकांची भूमिका ही विद्यार्थ्यांच्या हिताची असावी असे सभापती बाळासाहेब क्षीरसागर शेवटी म्हणाले.या वेळी पालकांनी आपल्या मनोगतातून भावना व्यक्त केल्या.व शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. याप्रसंगी शिक्षकांच्या वतीने ज्येष्ठ शिक्षक दाते सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले .या कार्यक्रमाला आनंदा मोगल, सुयोग गीते, विष्णू मोगल, विलास मोगल ,प्रकाश टरले, बाळकृष्ण मोगल, अशोक पोटे, सुनील



सातभाई, पुंजाराम कडलक ,निवृत्ती मोगल, प्रकाश कोरडे ,जितेंद्र पोटे, विजय मोगल ,तुषार मोगल, सुधाकर मोगल, मंगेश उगले आधी सर्व सन्माननीय स्कूल कमिटी सदस्य उपस्थित होते. मोठ्या प्रमाणात गावातील ग्रामस्थ, पालक व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते . याप्रसंगी माता पालक संघाची स्थापना करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भडांगे सर यांनी केले. तर आभार गोसावी सर यांनी केले.

# अंदमानमध्ये पहाटे भूकंपाचे धक्क

नवी दिल्ली : अंदमान निकोबार बेटांवर शुक्रवारी पहाटेच्या सुमारास भूकंपाचे धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ४.३ रिश्टर स्केल इतकी होती. या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा वित्तहानी झाली नसल्याचे वृत्त आहे. दिल्ली-एनसीआर भागात गेल्या आठवड्यात भूकंपाचे धक्के जाणवले होते. या भूकंपाच्या धक्क्यामुळे जमीन हादरली आणि घरातील भांडी खाली पडली. त्यामुळे गाढ झोपेत असलेले नागरिक घाबरून घराच्या बाहेर पळाले. यावेळी अनेकांनी रस्त्यावरच आसरा घेतला. त्यानंतर बराच वेळ या लोक रस्त्यावरच होते. त्यानंतर भूकंपाचा पुन्हा धक्का बसणार नसल्याचे लक्षात आल्यानंतर लोक आपापल्या घरात गेले.

# अधिकमासात भाविकांना देण्यात येणाऱ्या सोई सुविधांचे मंदिर समितीकडून सुयोग्य नियोजन

## दर्शनरांगेतील भाविकांकडून चांगल्या प्रतिक्रिया



पंढरपूर/प्रतिनिधीः अधिकमास दि.१८जुलै ते दि.१६ ऑगस्ट या कालावधीत संपन्न होत आहे. या कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. त्यांना सकाळी ६.०० ते रात्री १२.०० या वेळेत दर्शनव्यवस्था, दर्शनरांग व्यवस्थापनेसाठी बरेकेटींग व पत्राशेडची निर्मिती, लाईव्ह दर्शन व्यवस्था, पिण्याचे पाणी, शौचालये, विश्रांती कक्ष, बाथरूम, दर्शनरांग द्रुतगतीने चालविण्यासाठी स्वयंसेवकांची नियुक्ती, आपत्कालिन व सुरक्षा व्यवस्था, देणगी व्यवस्था, निवास व्यवस्था, भाविकांची अपघात विमा पॉलीसी, स्वच्छता व्यवस्था, फोटो व्यवस्था, चौकशी कक्ष, वैद्यकीय सुविधा, वॉटर एटीएम, लाडूप्रसाद व्यवस्था, अन्नछत्र व्यवस्था, चहा व खिचडी वाटप, चप्पल स्टँड, चेंजिंग रूम व हिरकणी / विश्रांती कक्ष व इतर अनुषंगीक सोई सुविधा भाविकांना उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी श्री. राजेंद्र शेळके व सह अध्यक्ष श्री. गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

तसेच दर्शनरांगेत नियमन राखण्यासाठी ऑनलाईन दर्शन बुकींग, पाद्यपूजा, तुळशीपूजा बंद ठेवण्यात आलेल्या आहेत.

दर्शनरांगेतील वाढती भाविकांची संख्या विचारात घेऊन, कायमस्वरूपी पत्राशेड येथे जादा दोन तात्पुरत्या पत्राशेडची निर्मिती करण्यात आली आहे. पत्राशेड येथे कुलरची व्यवस्था, पत्राशेड व बाजीराव पडसाळी येथे वैद्यकीय स्टॉल उभारण्यात आलेले आहेत. दर्शनरांगेत मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली आहे. १०८ क्रमांकाची व मंदिर समितीची रुग्णवाहिका तसेच पोलिस व मंदिर सुरक्षा कर्मचारी नेमणूक व सर्व रांगेत पर्यवेक्षण साठी मंदिर अधिकारी व कर्मचा-याची नियुक्ती करण्यात आली आहे.याशिवाय, अन्नछत्र येथे दुपारी १२.०० ते २.०० व सायंकाळी ७.०० ते ९.०० या वेळेत दोन वेळ पोटभर भोजनप्रसादाची व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्याचा दैनंदिन अंदाजे ३५०० ते ४००० भाविक लाभ घेत आहेत. तसेच दर्शनरांगेत मोफत चहा व तांदळाची / शाबुदाण्याची खिचडी वाटप करण्यात येत आहे. पोलीस विभागामार्फत देखील पुरेसा प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, चंद्रभागा वाळवंट, दर्शनरांग व इतर अनुषंगीक ठिकाणची स्वच्छता मंदिर कर्मचारी व स्वयंसेवी संस्थेमार्फत ठेवण्यात येत आहे.

या कालावधीत श्रींचे पदस्पर्शदर्शन दैनंदिन सरासरी २८००० व मुखदर्शन सरासरी २०००० भाविक घेत आहेत. भाविकांना पुरेसा प्रमाणात सोई सुविधा देण्याचा प्रयत्न मंदिर समितीचा राहणार आहे. त्यासाठी मंदिर समितीचे आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी, रोजंदारी कर्मचारी व स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक असे एकूण ७०० व्यक्ती सेवा करीत आहेत.

# एस एस सोशल ग्रुप पंच तालीम अक्कलकोट च्या वतीने नगरसेवक पै.सद्दाम शेरीकर यांच्या वाढदिवसानिमित्त फळे व भात वाटप.



अक्कलकोट/प्रतिनिधी : एस एस सोशल ग्रुप पंच तालीम अक्कलकोट च्या वतीने अक्कलकोट पंचक्रोषीतील बुलंद आवाज हजारो युवकांच्या, आधारस्तंभ,अक्कलकोट तालुक्यात नव्हे तर सोलापूर जिल्ह्यात एक विक्रमी रक्तदान करून नावलौकीक झालेले अक्कलकोट नगरपरिषदचे माजी नगरसेवक पै.सद्दाम शेरिकर यांच्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना फळे व मसाला भात वाटप करण्यात आले. तसेच अक्कलकोट शहरातील नूरदिन बाबा दर्गा व एस टी स्टँडच्या पाठीमागील झोपडपट्टीतील गोर गरिबांना फळे व मसाला भात

वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर व स्टॉप सोहेल फरास,असद फरास, मौलाली लोहारे (दुरी),कैफ नगणाळीकर, मुजमिल पिरजादे, मुस्तकिम बागवान,आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अल्तमश शेख,सादिक नाईकवाडी, रियाज नगणाळीकर, मौलाली शिकलगार, अल्तमश फरास, अयाज शेख, मोसिन मण्यार, सकिब मुल्ला, समीर शेख, साकीब खिस्तके व एस एस सोशल ग्रुपचे कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# लक्ष्मीदहिवडी येथे अभिजित पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वही वाटप संपन्न



मंगळवेढा/प्रतिनिधीः विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे विद्यमान चेअरमन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते अभिजित पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवेढा पंढरपूर मतदार संघामध्ये विविध कार्यक्रम राबवले होते.गावामध्ये जिल्हा परिषद शाळा व विद्यामंदिर हायस्कूल लक्ष्मीदहिवडी येथे सर्व विद्यार्थ्यांना वही वाटप करण्यात आल्या. त्यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रवीण कोळेकर, संचालक विठ्ठल पाटील, सावता परिषदेचे युवक सोलापूर जिल्हाध्यक्ष सयाजी बनसोडे, मनसे विद्यार्थी आघाडीचे जिल्हाध्यक्ष अविनाश बनसोडे,ग्रामपंचायत सदस्य हनुमंत शिरसागर,हरीचंद्र तटाळे, डॉ.प्रशांत पाटील, अनिल आदलिंगे, सोमेश्वर पाटील, महेश बनसोडे,दगडू माळी, श्रीकांत बनसोडे, तानाजी शिरसागर.मनोहर लिगाडे, संजय पाटील,संजय कडलासकर, आदी उपस्थित होते.त्यावेळी सूत्र संचालन प्रियांका जालगिरे यांनी केले आणि आभार मुख्याध्यापक बाळासाहेब रेड्डी यांनी मानले.



# नांदुर्डी येथे कृषिदुतांकडून ग्रामीण लोकसहभागीय मुल्यांकन

निफाड/प्रतिनिधीः नफाड तालुक्यातील नांदुर्डी गावात क. का. वाघ कृषी महाविद्यालयाच्या विदयार्थ्यांनी ग्रामीण लोकसहभागीय मुल्यांकन करताना गावकऱ्यांच्या मदतीने आराखडे तयार केले, या मध्ये गावकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. कृषिदुतांनी गावकऱ्यांच्या मार्गदर्शनाने गावातील विविध ठिकाणांची निरिक्षण करत माहिती मिळवली व ती माहिती आराखड्यांद्वारे जमीनीवर उतरवली. त्यात गावाचा आराखडा, गावातील विविध संसाधनांचा आराखड्यांचा समावेश होता. त्यानंतर गावातील विविध समस्यांवर गावकऱ्यांसमवेत चर्चा करून त्यांचे अभिप्राय घेण्यात आले.विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. हाडोळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. परमेश्वरी पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

# योगाचे शास्त्र आणि स्वामींचे वस्त्र जीवनाला लाभलेल्या महत्त्वाच्या पैलू : जान्हवी इंगळे

अक्कलकोट/प्रतिनिधीः योग अभ्यास आणि सध्याची जीवनशैली यांचा मेळ साधण्यासाठी वेगळा वेळ काढावा लागतो, हा मुळात लोकांचा गैरसमज आहे. आज वयाच्या या वळणावरही नियमितपणे माझा संपूर्ण वेळ योग अभ्यासाला देत असल्याने अनेक कठीण प्रसंगांना तोंड देताना योगाभ्यासाने राग, लोभ आणि अस्वस्थतेपासून दूर ठेवले. अर्थात योग हे शास्त्र आहे, आरोग्यरक्षणाचा, ईश्वर प्राप्तीचा मार्ग आहे. त्यामुळे त्याला कोणताही धर्म नाही, असे मला वाटते. आज योग शिकवताना अनेक देशांमध्ये जावे लागते. निरनिराळी माणसे भेटतात, वेगवेगळे धर्म, पंथ आणि वर्णाच्या या लोकांमध्ये वावरताना जरादेखील शंका मनात निर्माण होत नाही. कारण, आपण माणसांना जगणं शिकवणारे शिक्षक आहोत, हे आता मनाशी पक्के झाले आहे. ज्यांना विकार आहेत, त्यांचे विकार बरे करण्यासाठी योग आहे. ज्यांना विकार नाहीत, त्यांच्या चांगल्या आरोग्यासाठी योग आहे. तो कोणत्या धर्माचा नाही, कोणत्या जातीचा नाही. हे पटवून देताना मी अनेकांना सांगत असते एखादे आसन किंवा ध्यानधारणा करताना प्रार्थनेचा प्रश्न येतो. तेव्हा तुम्हाला आवडेल ती प्रार्थना म्हणा, यासाठी भाषा आणि धर्म गरजेचा नाही. जिथे मन एकाग्र होते, ती शाश्वत आनंद प्राप्त करण्याची शैली योग अभ्यासातून प्राप्त होते. यास अनुसरून माझी भक्ती आणि निष्ठा येथील वटवृक्ष निवासी श्री स्वामी समर्थांवर आहे. स्वामी समर्थांच्या नामस्मरणाने व योगाभ्यासाने माझे मन एकाग्र होते. ते माझ्या जीवनातील शाश्वत आनंद आहे. म्हणून



आज येथील श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतल्यानंतर लाभलेले स्वामींचे वस्त्र व योगाचे शास्त्र हे 'योगशास्त्र आणि स्वामींचे कृपा वस्त्र म्हणजे माझ्या जीवनाला लाभलेल्या महत्त्वाच्या पैलू आहेत असे मनोगत साताऱ्याच्या रहिवासी व अमेरिकेतील ग्रेस लेडी ग्लोबल अकॅडमीकृत मानद डॉक्टरेट पदवीने सन्मानित असलेले जान्हवी इंगळे यांनी व्यक्त केले. ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन नगरसेवक महेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सचिव आत्माराम घाटगे यांनी जान्हवी इंगळे यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी जान्हवी इंगळे बोलत होत्या. याप्रसंगी बोलताना महेश इंगळे यांनी जान्हवी इंगळे या एक उच्च विद्याविभुषीत संगणक अभियंता आहेत. शिक्षणाबरोबरच त्यांनी आरोग्य शिक्षणाचा ध्यास गांभीर्याने घेतला आहे, त्यामुळे नियमित योगासन करण्याचा छंद त्यांनी गेल्या अनेक वर्षांपासून जोपासलेला आहे. या योगा क्षेत्रात आता त्या गेल्या पंधरा वर्षांपासून योग साधना करत आयुष मिनिस्ट्री गव्हर्नमेंट सर्टिफाईड योगा शिक्षिका व योगा डिप्लोमा धारक आहेत. योग शाळेच्या माध्यमातून त्या ऑनलाइन माध्यमातून देश विदेशातील नागरिकांना विद्यार्थ्यांना मोफत योगाभ्यासाचे महत्त्व पटवून प्रात्यक्षिक व धडे देत आहेत. जान्हवी यांनी १३ सप्टेंबर २०२० रोजी सिद्धासन आसनामध्ये ५ तास १ मिनिट १७ सेकंद आसनस्थ राहून नवीन विश्वविक्रम केला. या विक्रमाची नोंद योगा बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये झाली. २०२१ मध्ये महिला दिनाचे औचित्य साधून नऊवारी साडी मध्ये १ तास १९ मिनिट ३४ सेकंदामध्ये १० हजार वेळा महिलांना उपयुक्त भद्रासन करून दुसरा नवा जागतिक विश्वविक्रम प्रस्थापित करीत तो समस्त महिलांना समर्पित केला. अशा या विश्वविक्रम जान्हवी यांना योगाभ्यासाने सुदृढ आरोग्य तर लाभलेले आहेच परंतु स्वामी समर्थांच्या आशीर्वादाने त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण होऊन त्यांना जीवनात सुख समृद्धी व ऐश्वर्य लाभू दे याकरिता स्वामी समर्थांच्या चरणी त्यांच्या प्रति नेहमीच प्रार्थना असतील अशा प्रकारचे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, संजय पवार, प्रसाद सोनार, स्वामीनाथ लोणारी, मनोज कामनुरकर, संतोष जमगे, अविनाश क्षीरसागर, विपुल जाधव, श्रीकांत मलवे इत्यादी उपस्थित होते.

# सचिन बेंडभर यांचे साहित्यिक कार्य कौतुकास्पद : विश्वास पाटील

पुणे : पुणे जिल्ह्यातील युवा साहित्यिक सचिन बेंडभर यांनी बालसाहित्य, कथासंग्रह, कवितासंग्रह, अनुवाद आणि कादंबरी यात विपुल लेखन केले आहे. आजपर्यंत त्यांची ५० पेक्षा जास्त पुस्तके प्रसिद्ध आहेत. अगदी कमी वयात त्यांनी साहित्य क्षेत्रात घेतलेली उत्तुंग भरारी ही कौतुकास्पद बाब आहे, असे गौरवोद्गार पानिपतकार विश्वास पाटील यांनी व्यक्त केले. उरुळी कांचन येथील मातोश्री गार्डनमध्ये पानिपतकार विश्वास पाटील यांनी आजच्या पिढीच्या युवा साहित्यिकांची भेट घेतली. तब्बल दोन तास चाललेल्या या चर्चेत त्यांनी युवा लेखकांना मार्गदर्शन केले व त्यांच्याशी दिलखुलास गप्पा मारल्या.

यावेळी पुणे जिल्ह्यातील आघाडीचे लेखक सचिन बेंडभर यांचा नुकताच प्रकाशित झालेला बालकाव्यसंग्रह मामाच्या मळ्यात त्यांनी जाणून घेतला. फवारणी कथा संग्रहातील त्यांच्या ग्रामीण कथांचा विषय समजून घेतला तर रानपाखरांची शाळा या कादंबरीच्या कथानकाची चर्चा केली. तसेच त्यांच्या झुंज एका पेशव्याची या कादंबरीचे कौतुकही केले. सचिन बेंडभरांसारखे



कसलेले लेखन करणारे साहित्यिक याच पिढीतून तयार होत आहेत आणि वाचकांचाही त्यांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे, हे मराठी भाषा संवर्धनासाठी आशादायी आहे, असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी साहित्यिक शहाजी नगरे, सोपान खुडे, खलील शेख आदी उपस्थित होते.

# प्रांत कार्यालयाकडून विविध दाखल्यासाठी विलंब होत असल्याने रिपाईकडून आंदोलनाचा इशारा : मडिखांबे

अक्कलकोट/प्रतिनिधी : प्रांत कार्यालय सोलापूर कडून सर्व जातीचा दाखला, नॉनक्रिमीनल दाखल्यासाठी विलंब होत असल्याने अनेक विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तरी संबंधित अधिकारी यांनी जातीने लक्ष घालून दाखले लवकर सोडण्यात यावे असे आदेश देण्यात यावे अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी केले आहे. प्रांत कार्यालयाकडून दाखले सोडण्यासाठी मुद्दाम टाळाटाळ करत आहेत. ते लवकरात लवकर करण्यात यावे.सध्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शाळा कॉलेजचे व



वसतीगृहाचे प्रवेश चालु आहे त्यासाठी जातीचा दाखल्याची अत्यंत गरज आहे. जातीच्या दाखल्याविना मागासवर्गीय विध्यार्थ्यांना मुद्दाम अडचणीत आणून अडवणूक करण्यात येत आहे. त्यामुळे विध्यार्थी व मागासवर्गीयांचे नुकसान झाल्यास रिपब्लीकन पक्ष(आठवले गट) च्या वतीने तिव्र आंदोलन करण्याचा इशारा तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे. पत्रकावर यावेळी सैदप्पा झळकी,अजय मुकणार,शुभम मडिखांबे,अप्पा भालेराव व अंबादास गायकवाड संदिप गायकवाड, राजु बोरगाव विजयकुमार पोतेनवरू, राजु भगळे यांच्या सह्या आहेत.

# मंगळवेढा शहरात राष्ट्रवादीचे काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार साहेबांचे जंगी स्वागत होणार..

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार उद्या सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस मधील झालेल्या फुटी नंतर शरद पवार यांचा सोलापूर जिल्ह्यातील पहिलाच दौरा असणार आहे. सोलापूर येथील कार्यक्रम झाल्यानंतर सांगोला कडे जाताना मंगळवेढा नगरीत शरद पवार यांचे जंगी स्वागत करण्यात येणार असल्याचे श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत आबा पाटील यांनी सांगितले आहे.

मंगळवेढा तालुका हा शरद पवार यांच्या विचारांना मानणारा तालुका म्हणून ओळखला जातो. त्यामुळे शरद पवार यांच्या स्वागतासाठी कार्यकर्ते नेतेमंडळी यांनी जोरदार तयारी केली आहे. श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी शरद पवार यांना मानणाऱ्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांना शिवप्रेमी चौक मंगळवेढा येथे जंगी स्वागतासाठी येण्याचे आवाहन केले आहे. खा.शरदचंद्रजी पवार साहेब यांचा



उद्या मंगळवेढा येथे दुपारी १२वाजता माचाणूर चौक येथे स्वागत व तिथून (शेतकरी हॉटेल पासून) रॅली निघेल. तसेच मंगळवेढा शहर लगत पहिल्या ब्रीज पासून बोरळ नाक्यापासून दामाजी चौकाकडे रवाना होऊन दामाजी चौक येथे आगमन होणार आहे. तसेच शिवप्रेमी चौकात सत्कार समारंभाचे आयोजन असल्याचे सांगितले आहे.